## जन वाचन आंदोलन

जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किंमती परवडत नाहीत. अशा नववाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

**या आंदोलनातून काय साध्य होईल?**

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वत: विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.



देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.

भारत ज्ञान विज्ञान समिती

किंमत रु.२-५०

# खेळ बुद्धीबळाचा

लेखक : चंद्रकिरण राठी

रुपांतर : विनय र.र.



भारत ज्ञान विज्ञान समिती

पुस्तकाचे नाव : खेळ बुद्धीबळाचा
लेखक : चंद्रकिरण राठी
मराठी रुपांतर : विनय र.र.

चित्रकार : शरद

प्रकाशन : जानेवारी १९९७
जवाआं/म : पंधरा

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समिती तर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित

©सर्वाधिकार सुरक्षित : भारत ज्ञानविज्ञान समिती

**मूल्य : २ रुपये ५० पैसे**

---

प्रकाशक / मुद्रक : दत्ता देसाई
राज्य समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र),
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे ४११०३०
फोन : ४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४

---

अक्षर जुळणी / मांडणी : दिनानाथ मनोहर

# खेळ बुद्धीबळाचा

खेळ! हा शब्दच किती छान आहे. कारण खेळ ही गोष्ट सगळ्यांना आवडणारी आहे. खेळांशिवाय आयुष्याला अर्थ काय? जगण्यात मजा कुठून? खेळ म्हटला की हरणं-जिंकणं आलं. चढाओढ आली. पण खेळ म्हणजे एकापेक्षा जास्त जणांनी एकत्र येणं. खेळ माणसांना एकत्र आणतात. मिळून काहीतरी करायला शिकवतात. खेळ थकवा घालवतात. आपल्यात काहीतरी नवं करायची इच्छा निर्माण करतात. खेळामुळं शरीराला आणि मनाला व्यायाम होतो. मन ताजंतवानं होतं आणि बुद्धी तरतरीत होते.

खेळ म्हटला की डोळ्यासमोर पटांगण येतं. पण सगळेच खेळ काही मैदानी नसतात. बरेच खेळ बैठे खेळ असतात. त्यात शरीरापेक्षा बुद्धीचं काम जास्त असतं. आठवा बरं असे खेळ!

यात काही खेळ दान टाकून खेळायचे असतात. उभे फोडलेले चिंचोके, कवड्या, फासे किंवा सहा बाजूंवर एक ते सहा ठिपके असलेला ठोकळा वापरून दान टाकले जाते. पण अशा खेळात बुद्धीची कसोटी कमी असते. नशिबाचा खेळ जास्त असतो. काही वेळा लोक चलाखीही करतात.

पण काही खेळ असे असतात की त्यात दान, नशीब वगैरे काही नसतं. त्यात बुद्धीचा वापर नीट करावा लागतो. खेळातलं कौशल्य आवश्यक असतं. खेळणाऱ्याचा आत्मविश्वास महत्वाचा असतो.

असे खेळ माणसानं फार प्राचीन काळापासून शोधले आहेत. ते शोधले कुणी, सुधारले कुणी हेही आपल्याला ठाऊक नाही. पण आपण हजारो वर्षे ते खेळत आलो आहोत. आठवा बरं असा बुद्धीचा एखादा खेळ. आठवला?

बरोब्बर! फुली आणि गोळा काढण्याचा खेळ हा अशा प्रकारचा आहे. पाटीवर किंवा फरशीवर दोन उभ्या व दोन आडव्या रेषा काढायच्या. नऊ घरं तयार होतात. दोघंजण

| | | |
|---|---|---|
| x | o | x |
| | o | |
| | x | |

| | | |
|---|---|---|
| o | x | |
| | o | x |
| x | | o |

हा खेळ खेळतात. एकजण गोळा काढतो, दुसरा फुली. एकावेळी एकानंच काढायचं आणि आळीपाळीनं खेळायचं. आपली तीन चिन्हं सरळ रेषेत यावीत म्हणून प्रत्येकजण प्रयत्न करतो. आणि समोरच्याला तसं करता येऊ नये



म्हणून धडपडतो. दोघं हुषार असले तर कोणीच जिंकू शकत नाही.


पण हा खेळ अगदी कच्चा लिंबू वाटेल असा एक जगप्रसिद्ध खेळ आहे. त्याचं नावच आहे बुद्धीबळ. त्याच्या पटावर चौसष्ट घरं असतात. चौरस आकाराची. एका आड एक काळ्या व पांढऱ्या रंगाची. हा खेळदेखील दोघांमध्ये खेळला जातो. प्रत्येकाकडे आठ प्यादी (सैनिक) असतात. शिवाय दोन हत्ती, दोन उंट, दोन घोडे, वजीर व राजा. प्रत्येकाकडं एकूण सोळा सोंगट्या. मात्र एकाला काळ्या रंगाच्या, तर दुसऱ्याला पांढऱ्या रंगाच्या - दोघांच्या वेगवेगळ्या ओळखता याव्यात म्हणून. प्रत्येक सोंगटीची चाल आणि खेळाचे नियम काटेकोरपणे ठरलेले. नीट समजून घ्यावे लागतात असे. पण खेळ कसा? हजारो वर्षांपासून भल्याभल्यांना वेड लावणारा. शास्त्रज्ञ, कलाकार, लेखक, राजकारणी आणि राजेमहाराजे सगळ्यानांच.

हा खेळ पाच हजार वर्षापेक्षा जास्त जुना आहे. त्याच्या गोष्टी मोठ्या मजेदार आहेत. हा खेळ केंव्हा, कसा सुरू झाला याबद्दल खात्रीशीर माहिती नाही.

असं म्हणतात की एकदा एका राणीचा मुलगा लढाईत मारला गेला. ही वाईट बातमी राणीला सांगायची कशी?

कोणालाच धाडस होत नव्हतं. मग सेनापतीनं म्हणे डोकं चालवलं. त्यानं बुद्धीबळाचा खेळ तयार केला. मग राणीसमोर बुद्धीबळाच्या सोंगट्या मांडल्या. आणि खेळातून इशारा करून त्यानं राजपुत्र मेल्याचं राणीच्या लक्षात आणून दिलं.

खेळाचं नाव बुद्धीबळ. पण खेळात मात्र युद्ध असतं. बुद्धीबळाचा पट म्हणजे जणू रणांगण. मात्र या युद्धात हत्यारं नसतात. रक्तपात नसतो. तरीही दोन्ही खेळाडूंनी एकमेकाविरूद्ध सैन्य लढवायचे असते. रणांगणावर कोण कुठं आहे हे दोघांना दिसत असतं. पूर्ण माहित असतं. जो दुसऱ्याच्या पुढच्या चालीचा अंदाज घेतो आणि विचारपूर्वक




चाली करतो तो जिंकतो.

बगदादचा सुप्रसिद्ध खलिफा हरून-अल-रशीद याची गोष्ट. त्याच्या दरबारात एकदा एक राजा आला. त्यानं खलिफाला विचारलं, '' हे बुद्धीबळ आहे तरी काय हो?'' खलिफानं उत्तरादाखल प्रश्न केला, ''हे जीवन आहे तरी



काय हो?'' जीवन म्हणजे नेमके काय हे जसं सांगता येत नाही तसंच बुद्धीबळाचं आहे, असं खलिफाला म्हणायचं असावं. स्वत: खलिफाला बुद्धीबळाची फार आवड होतीच पण त्याच्या तिन्ही मुलांना तर बुद्धीबळाचं व्यसनंच होतं. हे अवाढव्य राज्य संभाळणं सोपं पण बुद्धीबळाच्या बत्तीस सोंगट्या सांभाळतांना नाकात दम येतो असं ते म्हणायचे.

बुद्धीबळाला पूर्वी प्याद्यांचा खेळ म्हणत. त्याला चतुरंगदेखील म्हणत. भारतात पूर्वी सैन्याला चतुरंगिणी म्हणायचे. त्यात रथ, हत्ती, घोडे आणि मंत्री असायचे. चतुरंग खेळताना पूर्वी फासे वापरत. फासे फेकून मिळणाऱ्या दानावर कोणते प्यादं हलणार ते ठरायचं. त्यामुळं या



खेळातील हार-जीत नशीबावर ठरायची. पण हळूहळू फासे टाकायची पद्धत गेली. विचार करून चाल करण्याची पद्धत

आली.

पूर्वी म्हणजे चार - पाचशे वर्षांपूर्वी बुद्धीबळातल्या सोंगट्या भल्यामोठ्या असायच्या. त्या धातूपासून बनवलेल्या असत. एक गोष्ट सांगितली जाते. एकदा बुद्धीबळ खेळताना एक राजपुत्र इतका चिडला की त्यानं सोन्याचा राजा उचलून समोरच्या खेळाडूच्या डोक्यात घातला. तो खेळाडू डोकं फुटून मेला. राजपुत्राला फाशीची शिक्षा ठोठावली गेली. शिक्षेच्या अंमलबजावणीपर्यंत त्याला तुरुंगात ठेवला. पण तिथंही तो गप्प कसा बसणार? तुरुंगप्रमुखाशी तो बुद्धीबळ खेळू लागला. एकदा त्याच्याशी भांडण झालं. त्याहीवेळी राजपुत्रानं तुरुंगप्रमुखाला असंच प्यादं डोक्यात मारून ठार केलं.

आता त्याच्याशी बुद्धीबळ खेळायला कोणीच तयार होईना. राजपुत्र उदास झाला आणि दु:खी झाला. त्याचं बुद्धीबळावरचं प्रेम ऐकून एक अमीर त्याच्याशी खेळायला आला. ते खेळात पूर्ण गुंगून गेले होते. त्याला फाशीच्या तक्तावर चढवण्यासाठी न्यायला दोन शिपाई आले. राजपुत्राने त्यांना थांबायला सांगितलं. पण ते त्याला बळजबरीने उचलून नेऊ लागले. राजपुत्राने एकाला खेळातील घोड्याने तर दुसऱ्याला प्याद्याने ठार केले. फाशी लटकवणाऱ्याला त्याने खेळातील राजा उचलून ठार





केले, आणि तो शांतपणे पुन्हा खेळायला बसला.

बुद्धीबळाच्या नादात जगाला विसरणाऱ्यांच्या अशा अनेक कथा सांगितल्या जातात. जगप्रसिद्ध हिंदी लेखक प्रेमचंद यांच्या शतरंज के खिलाडी चे नायक मीर आणि मिर्जा यासाठी प्रसिद्धच आहेत.

बुद्धीबळाचा प्रसार इस्लामबरोबर वाढला. इस्लाम धर्मात बुद्धीबळ खेळण्यास परवानगी आहे का? असा प्रश्न विचारला जाऊ लागला. कारण इस्लामधर्मात मूर्ती वापराला विरोध

आहे आणि बुद्धीबळातील सोंगट्या पूर्वी मूर्तीसारख्याच असायच्या. बुद्धीबळप्रेमींनी उत्तर शोधून काढलं. बुद्धीबळाच्या सोंगट्यांचं रूप बदलून त्या मूर्तीसारख्या दिसणार नाहीत असं केलं. अरबी, फारसी राजे ख्रिश्चनांना बुद्धीबळ शिकवित गेले. अशाप्रकारे बुद्धीबळाचा प्रसार होत गेला.

आपल्या देशात पूर्वी काही राजे बुद्धीबळ अत्यंत क्रूर पद्धतीने खेळत. राजवाड्यात मोठ्या खोलीत काळ्यापांढऱ्या फरशा बसवून जमिनीवर बुद्धीबळाचा पट केलेला असे. हत्ती, घोडे, प्यादी अशी सर्व रूपे घेऊन दासी वा गुलाम त्या पटावर उभी रहात. दोन्ही बाजूला उंच आसनावर राजे व दरबारी मंडळी खेळायला बसत. जी सोंगटी हलवायची त्या दासीला वा गुलामाला भाल्याच्या टोकाने टोचून पुढे ढकलत!


बुद्धीबळ खेळणं ही एक कला बनली. पण बुद्धीबळाचे नियम महत्वाचे असतात. ते गणितातल्या नियमांप्रमाणेच असतात. केवळ सांगून वा ऐकून ते समजत नाहीत. गणित जसं स्वत: सोडवल्यावरंच समजतं, तसंच बुद्धीबळही स्वत: खेळूनच समजतं.

बुद्धीबळ अनेक प्रकारे खेळले जाते. खरंतर पटावरच्या सोंगट्या डोळ्यांनी पाहून खेळण्याचा हा खेळ. पण डोळ्यांना



पट्टी बांधूनही हा खेळ खेळतात. त्यात एकाची चाल दुसऱ्याला तोंडी सांगितली जाते. अशा प्रकारे स्मरणशक्तीचा खूप वापर करून हा खेळ खेळतात.

अठराव्या शतकात एक थोर संगीतकार झाले. त्यांचे नाव फिलॉंडर. ते एकदा एकावेळी तिघांशी डोळ्यावर पट्टी



बांधून बुद्धीबळ खेळले व तिघांशीही जिंकले.

हा खेळ अंध लोकही मजेने खेळतात. त्यासाठी एक खास प्रकारचा पट असतो. त्यातल्या सोंगट्या घरांमध्ये बरोबर अडकवता येतात. काळी घरे पांढऱ्या घरांपेक्षा थोडीशी वरती असतात. सोंगट्यांना स्पर्श करून खेळाडू सोंगट्या ओळखू शकतात. काळ्या सोंगट्यांची डोकी मुद्दाम वाकडी केलेली असतात. अंध बुद्धीबळपटूंचे सामने होतात. त्यांचे

एक स्वतंत्र मंडळही आहे.

बुद्धीबळातील श्रेष्ठ खेळाडू कधी कधी एकावेळी अनेक खेळाडूंशी खेळतो. तो इकडून तिकडे फिरत असतो, बाकीचे खेळाडू आपापल्या समोर पटांवर सोंगट्या मांडून बसलेले असतात. श्रेष्ठ दर्जाच्या खेळाडू बरोबर खेळण्याचा अनुभव काही वेगळाच असत्तो. भीती, धास्ती असते, तशीच उत्सुकताही. खूप नवे शिकायला मिळते.

बुद्धीबळ टपालाने ही खेळला जातो. याची एक गंमत सांगतात. पत्राने बुद्धीबळ खेळणाऱ्यांपैकी एकजण होता उत्तर ध्रुवावर तर दुसरा होता दक्षिण ध्रुवावर. त्यांचा हा खेळ चालला होता दहा वर्षे. एकाची चाल दुसऱ्याला पत्राने समजायला चार महिने लागायचे. त्या चार महिन्यात प्रतिपक्षाचा भिडू कसा खेळेल याचा ते विचार करत. पण प्रत्यक्ष पत्र आल्यावरच दुसऱ्याची खेळी स्पष्ट व्हायची. एकदा पत्र मिळायला फार उशीर झाला, तेव्हा उत्तर ध्रुवावरचा खेळाडू अतिशय अस्वस्थ झाला. मग त्याला हवे ते पत्र मिळाले. पण त्यात दक्षिण ध्रुवावरच्या भिडूने लिहिले होते - मला आधीची चाल बदलायची आहे!

बुद्धीबळाचा नियम असा आहे की, एकदा सोंगटी उचलली की तिचीच चाल केली पाहिजे. मात्र जर सोंगटीला




स्पर्श केल्याकेल्या खेळाडूने म्हटले की मला दुसरी चाल करायची आहे तर ते चालते. त्या खेळाडूने याच नियमाचा आधार घेतला.

१५ नोव्हेंबर हा जागतिक बुद्धीबळ दिवस मानतात. क्युबामधील कासाब्लांक या १८८५ साली जन्मलेल्या बुद्धीबळपटूचा तो जन्मदिन. त्याने बुद्धीबळावर कैक पुस्तके लिहिली आहेत.

कासाब्लांक चार वर्षांचा असतानाची गोष्ट. त्याचे वडील कोणाशीतरी बुद्धीबळ खेळत होते. कासाब्लांक ते पहात होता. तो वडिलांना म्हणाला की तुम्ही घोड्याची चाल चुकीची केली आहे. वडील रागाने म्हणाले, ''गाढवा, बुद्धीबळ म्हणजे काय हे तरी समजतं का तुला? कधी खेळला तरी आहेस का?'' कासाब्लांक म्हणाला, ''मी बुद्धीबळ खेळू शकतो आणि तुम्हाला हरवूपण शकतो.'' हे ऐकून वडील सरसावले. म्हणाले, ''चल, खेळू.'' खेळ झाला आणि कासाब्लांक जिंकला!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन बुद्धीबळ खेळायचे. एकदा ते सर्वोच्च न्यायाधिशांबरोबर खेळत बसले होते. त्यांचा मुलगा टेड तेथे आला आणि काही विचारू लागला. लिंकन खेळात गढून गेले होते. त्यांना काही ऐकूच आलं

नाही. टेडने चिडून पट उधळून लावला. न्यायाधीश भयंकर रागावले व म्हणाले, ''हार-जीत कोणाची ते आता कधीच कळणार नाही.'' लिंकन शांतपणे म्हणाले, ''टेड जिंकला असे मानू.''



१८८३ ते ८५ या काळात बेडलाभ येथील वेडे व केंब्रिज विद्यापीठाचे विद्यार्थी यांच्यात सामने झाले. त्यात केंब्रिजचे विद्यार्थी हरले. इंग्रजीतील प्रसिद्ध कादंबरीकार चार्ल्स डिकन्स यांच्या मते बुद्धीबळ खेळण्यातून जीवनाच्या प्रत्येक समस्येचे उत्तर सापडू शकते. भारतीय बुद्धीबळपटू विश्वनाथन आनंद आज जगप्रसिद्ध आहे. जगातला सर्वोच्च खेळाडू होण्यासाठी अजिंक्यवीर कास्पोरोव्हशी तो पुन:पुन्हा लढतो आहे.

आता संगणकावरही बुद्धीबळ खेळता येते. रशियातील एका तंत्रज्ञाचे म्हणणे असे की संगणक थोड्याच दिवसात



सगळ्यांना हरवेल. जगात जेता ठरेल! बऱ्याच जणांना वाटतं माणूस आणि यंत्र यांच्यात कोण जिंकेल हे सांगणं कठीण आहे.

पण अलीकडची एक गंमत माहित आहे? जगज्जेता कास्पारोव्ह एकदा संगणकाबरोबर खेळत होता. सामना अटीतटीचा होता. कोणीच हटायला तयार नव्हते. संगणक प्रत्येक चाल अतिशय पद्धतशीरपणे करत होता. शेवटी गंमत म्हणून कास्पारोव्हने एक प्यादं पुढं सरकवलं. प्यादं मेलं तर मेलं अशा विचारानं त्यानं प्यादं सरकवलं होतं. पण काय आश्चर्य! अचानक ती खेळी पाहून संगणक भांबावला, गडबडून गेला. अत्यंत तर्कशुद्ध विचार करणारं ते यंत्र, ही अशी अविचारी गोष्ट पाहून गोंधळून गेलं, कसं खेळावं ते त्याला सुचेना. शेवटी संगणक हरला!

यंत्र माणसाला जिंकेल ही भीती अनाठायी नाही का? संगीत बनवणारी यंत्र आहेतच. मात्र कोणतेही यंत्र अजून तानसेन किंवा कुमार गंधर्व झालेले नाही. संगणकावर झटपट आकडेमोड होते, पण कोणतेही यंत्र गणितज्ञ झाले नाही. उद्या कदाचित नाटक लिहिण्याचे किंवा शब्दरचना करण्याचे यंत्रसुद्धा बनवले जाईल. पण तरीही कुठलेच यंत्र शेक्सपिअर, कालिदास किंवा रविंद्रनाथ टागोर होऊ शकणार नाही.

*****